शिवसेना

!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प


प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# गणेशोत्सवात अखंड वीज पुरवठा करा

# शेतकऱ्यांना पैसे मागणाऱ्या ठेकेदारांवर गुन्हे नोंदवा

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे जिल्हाविद्युतीकरण समितीच्या बैठकीत आदेश

संभाजीनगर दि.३१– महावितरणचे काम करणाऱ्या ठेकेदार शेतकऱ्यांना लुटत आहेत. त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करा, असे आदेश देत तसेच पैसे मागणाऱ्या ठेकेदार किंवा त्यांच्या माणसांची तक्रार थेट मुख्य अभियंत्यांकडे करा असे आवाहन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले. गणेशोत्सवात वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची काळजी घ्या व गणेश मंडळांना सवलतीच्या दरात तात्काळ वीज उपलब्ध करुन द्या असे निर्देश खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले.

शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विद्युतीकरण समितीची बैठक आज मिलकॉर्नर येथे महावितरणच्या मुख्य अभियंता यांच्या कार्यालयातील सभागृहात पार पडली. चुकीची वीज बिले, तसेच बिलांच्या तक्रारींचा निपटारा होईपर्यंत वीज बिलाला व्याज आकारणी करु नका अशा सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या. आमदार अतुल सावे यांनी एन–३, एन–४ मध्ये पन्नासहुन अधिक नागरीकांच्या विद्युत साधनांचे महावितरणच्या दिरंगाईमुळे नुकसान झाल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच पुंडलीकनगर, मातोश्रीनगर येथील मंजुर रोहित्र तात्काळ बसवण्याची मागणी बैठकीत केली. चुकीची बिले, लोंबकाळलेल्या तारा व उघड्या डिपींचा प्रश्न बैठकीत वादळी ठरला. चार स्मरणपत्रे देऊनही महावितरण लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या कामांची दखल घेत नसल्याची तक्रार आमदार अतुल सावे यांनी केली. तर उपजिल्हाप्रमुख राजु राठोड यांनी सोयगाव, बनोटी सारख्या दुर्गम भागात वरीष्ठ अधिकारी उपलब्ध होत नसल्याने समाजहिताची अनेक कामे रेंगाळलेली असल्याचे निदर्शनास आणुन दिली, त्यावर मुख्य अभियंता गणेशकर यांनी शुक्रवारी बनोटी सोयगाव भागत लोकप्रतिनिधींच्या तक्रारी सोडवण्यासाठी उपस्थित राहू असे आश्वासन दिले. महावितरणनी उपकेंद्रासाठी घेतलेली समाधान कॉलनीच्या जागेवर अतिक्रमण होत असल्याने संरक्षक भिंत करुन संरक्षीत करा. तसेच ज्याकामासाठी जमीन घेतली आहे ते कामही तात्काळ सुरु करण्याचे खासदार खैरे यांनी मुख्य अभियंत्यांना सांगितले.

**खासदारांच्या पाठपुराव्यामुळे दोन लाखांची मदत**

कृष्णा रमेश भागडे या बोडखा येथील शेतकऱ्याचा ११ जुन २०१५ रोजी विद्युत अपघातात मृत्यु झाला होता, त्यांच्या कुटूंबियांना महावितरण कडुन मदत मिळावी यासाठी खासदार चंद्रकांत खैरे यांनी ११ महिने पाठपुरावा करुन शेवटी गेल्या महिन्यातील बैठकीत महावितरण मदत देणार नसेल तर मी खिशातुन मदत करेल असा पवित्रा घेतल्याने या बैठकीत कृष्णा भागडे यांच्या पत्नी छाया भागडे व आजोबा दादाराव सपकाळ यांना २ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजुर झाल्याचे पत्र आज खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत सुपुर्त केले.

**युवासेनेच्या निवेदनाची दखल**

कन्नड तालुक्यातील जळगाव घाट येथे सिंगल फेज डिपी बसवण्यासाठी उपतालुका युवा अधिकारी अक्षय शिरसाठ यांनी विद्युतीकरण समितीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांना निवेदन सादर केले. त्यावर तात्काळ दखल घेऊन डिपी बसवण्याच्या सुचना मुख्य अभियंता गणेशकर यांनी कन्नड उपविभागीय अधिकाऱ्यांना दिल्या.

**तक्रार निवारण केंद्रावर तक्रार नोंद करा**

दुधडेअरी सिग्नल येथे महावितरणच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या तक्रार निवारण केंद्रावर तक्रार दाखल करणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण कमी असल्याने सुविधा उपलब्ध असतांनाही मदत करणे शक्य होत नाही व तक्रार निवारणासाठी वेळ लागतो त्यामुळे चार वेगवेगळया ठिकाणी तक्रारी नोंदवण्याच्या ऐवजी वीज ग्राहकांनी तक्रार असल्यास वीज ग्राहक केंद्रात तक्रार नोंदवावी असे आवाहन शहर विभाग–२ चे नवनियुक्त कार्यकारी अभियंता अमित कुलकर्णी यांनी केले.

एल ॲण्ड टी कंपनीनी बदललेल्या ४७ हजार मीटरची चौकशी करण्यात यावी तसेच फॉल्टी मीटरच्या तक्रारी असलेल्या ग्राहकांचा मागोवा घ्या व वीज ग्राहकांना विश्वासात घेऊन तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या. तसेच जिल्हापरिषद अध्यक्ष श्रीराम महाजन यांनी शेतकऱ्यांवर सरसकट गुन्हे दाखल करु नका अशी मागणी बैठकीत केली. राष्ट्रिय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्ता रुंदीकरणासाठी जालना रोड व बीड बायपास साठी चालु असलेल्या नकाशा बनविण्यात कामात प्रकल्प संचालक यु जे चामरगोरे यांना सहकार्य करण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या. गंगापुर, वैजापुर, पैठण, कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांसह बजाजनगर, वाळुज, सातारा परिसरातील नागरीकांच्या तक्रारी बैठकीत उपस्थित करण्यात आल्या. त्या समस्या तात्काळ सोडवण्याचे निर्देशही त्यांनी बैठकीत दिले. यावेळी ॲड. आसाराम रोठे, गिरजाराम हळनोर, हिरा सलामपुरे, सुनिता देव, किरण शर्मा, उपजिल्हाधिकारी चोरमारे, अधिक्षक अभियंता अग्रवाल, कार्यकारी अभियंता पठाण, फुलकर, ग्राहक प्रतिनिधी एम बी कुलकर्णी, बाबासाहेब डांगे, रमेश तारापुरे, बी व्ही जोशी, सुधीर भाले, बंडु शिंदे, अक्षय शिरसाठ, गणेश लोखंडे, श्रीरंग आमटे, विनायक देशमुख, अजय यादव, किरण गणोरे, शिवा खानखुळे, जनक्रांती संघटनेचे प्रदिप त्रिभुवन, यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

फोटो मेल केला आहे.

योगेश पायघन / गणेश वाघ


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525